**क्र.का.१२/मुद्रांक परतावा/१९१०-६२**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे १**
**दिनांक :- १३.५.१९९३**

**विषय :- मुद्रांकाचा परतावा मंजूर करण्याच्या प्रकरणी मुद्रांकांच्या खरेपणाबाबत छाननी करणे.**

**प रि प त्र क :-**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ५२अ(१)(२)(३) अन्वये मुद्रांकाचा परतावा देण्याच्या प्रकरणांवर निर्णय घेण्यापूर्वी संबंधित मुद्रांक बनावट नाहीत याची खातरजमा केली जाणे आवश्यक आहे. अशा शासनाच्या वित्त विभागाच्या सूचना असल्याने सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, मुद्रांक अधिक्षक मुंबई यांनी मुद्रांकाबाबत काळजीपूर्वक छाननी करून सकृतदर्शनी जे मुद्रांक खरे आहेत असे निदर्शनास येईल अशा मुद्राकांचा परतावा देण्याबाबत विचार करावा. परवानाधारक मुद्रांक विक्रेत्यांकडून मुद्रांक विकत घेतलेले आहेत किंवा कसे ही बाब यासाठी प्रामुख्याने विचारात घेण्यात यावी. छाननी नंतर जे मुद्रांक बनावट नाहीत असे सकृतदर्शनी स्पष्ट होईल त्याचेबाबत तसे प्रमाणपत्र देऊन नंतरच परतावा देण्यात यावा. तसेच अशा छाननीनंतर जे मुद्रांक बनावट आहेत अशी शंका उत्पन्न होईल, त्या मुद्राकांच्या खरेपणाबद्दल अधिकृत शास्त्रशुध्द तपासणी करून घेणे आवश्यक राहील, असेही स्पष्ट करण्यात यावे.

परताव्याबाबत या कार्यालयास प्रस्ताव पाठविताना, मुद्रांक जिल्हाधिकार मुद्रांक अधिक्षक यांचेकडून वरीलप्रमाणे येणे आवश्यक आहे. याबाबत निष्काळजीपणा आढळून आल्यास संबंधितांवर प्रशासकीय कारवाई केली जाईल याची विशेषत्त्वे नोंद घ्यावी.

**का.प्र.मा.नोंद.म.नि.**
**यांचे मान्यतेने -**

**सही/**
**(सू.शा.माळी)**
**उपनोंदणी महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत :-**

**१) अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई**
**२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक**
**३) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व सह जिल्हा निबंधक**
**४) मुद्रांक अधिक्षक, मुंबई**
**५) सर्व कार्यासन अधिकार, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.**